किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ● रणधुमाळी
५ ● उपेक्षेच्या तळाशी दडपलेले कर्तृत्व
१० ● सरकारचा आकार फुगला आहे का ?
१७ ● **अर्थबोधपत्रिका पुरवणी**
शहरीकरणाचा 'पॅटर्न' आणि आव्हाने

**खंड १५ : अंक १२** **मार्च २०१७**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**
**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १५ (अंक १२) मार्च २०१७**
**संपादक - अभय टिळक**
**सहसंपादक - मानसी सराफ जोशी**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?'*

- ●उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ●अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ●निःपक्ष व साधार
- ●सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- ●मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ●निवडक साहित्याचे संकलन
- ●संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ●संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

●अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# रणधुमाळी

दरवर्षीप्रमाणेच यंदाही ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' मोठ्या हिरिरीने साजरा केला गेला. परखडपणे बोलले-लिहिले तर अलीकडे कोणाच्या ना कोणाच्या तरी भावना दुखावल्या जाण्याची धास्ती कायमच असते. तरीही काही बाबी स्पष्टपणे उपस्थित करणे गरजेचे ठरू लागलेले आहे. वर्षभरातून एक दिवस 'जागतिक महिला दिन' उत्सवपूर्वक साजरे करणारे आपण सगळेच त्याच स्त्रीत्वाची योग्य आणि न्याय्य बूज उरलेले ३६४ दिवस निगुतीने राखतो का ? अगदी ज्ञानव्यवहारासारख्या पवित्र आणि प्रगल्भ गणल्या जाणा-या क्षेत्रातही महिलांना दिल्या जाणा-या उपेक्षित, अवमानकारक वागणुकीचे अनंत कवडसे आपल्या भवताली पडलेले सापडतील. पुरु षी अहंगंडाने पदरात घातलेले वंचनेचे दान पचवूनही, स्वतःच्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या बळावर संशोधनाच्या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी बजावणा-या एका कर्तृत्त्वशालिनीचा परिचय 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात त्याचसाठी आवर्जून सादर केलेला आहे. नव्यानेच सुरू झालेल्या कॅलेंडर वर्षातील यंदाचा फेब्रुवारी महिना विलक्षण वर्दळीचा ठरला. खास करू न शहरी महाराष्ट्राच्या दृष्टीने तर तो अगदी रणधुमाळीचाच भासला ! लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वांत मोठे आणि राजकीयदृष्ट्या कमालीचे संवेदनशील समजले जाणारे आपल्या देशातील उत्तर प्रदेश हे राज्य २०१७ सालातील फेब्रुवारी महिन्यात विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे गेले. उत्तर प्रदेशसह आपल्या देशातील अन्य चार राज्येही विधानसभांच्या निवडणुकांनी गजबजलेली असली तरी सगळ्यांचे लक्ष लागून राहिलेले आहे ते उत्तर प्रदेशकडेच. उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच केंद्रातील सत्तारूढ सरकारने नोटाबदलीपासून ते थेट केंद्रिय अर्थसंकल्प पुरा एक महिना अगोदर सादर करण्यापर्यंत पावले उचलली, अशा आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही झडलेल्या आपण बघितल्या. हे सगळे वादळ एकीकडे घुमत असले तरी शहरी महाराष्ट्रही दुसरीकडे त्याच्या परीने व्यस्त होताच. कारण, मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड यांसारख्या दिग्गज आणि गुंतागुंतीच्या महानगरपालिकांसह



राज्यातील एकंदर १० महानगरपालिका व जिल्हा परिषदामध्येही निवडणुकांची रणधुमाळी याच फेब्रुवारी महिन्यात रंगली. त्या निवडणुकांच्या घुसळणीतून आताशा कोठे राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय विश्व स्थिरस्थावर होते आहे. निवडणुकांच्या प्रचारादरम्यान आणि निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता जे कवित्व गाजले त्याचा एक मोठा विशेष सगळ्यांच्याच ध्यानात आला असावा. तो असा की, ही सारी चर्चा केवळ राजकीय विश्वातील घावडाव व आघाड्या-सोयरिकींपुरतीच मर्यादित राहिली. या आधी झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकांदरम्यानही हाच 'पॅटर्न' दिसला. निवडणुका ही मुख्यतः आणि प्रथमतः राजकीय बाब असते हे गृहीत धरले तरी त्या राजकारणाचे अस्तर असणा-या सामाजिक-आर्थिक प्रश्नांची घुसळण प्रकर्षाने झाल्याचे या वेळी काही कोठे अनुभवास आले नाही. प्रचार-प्रसाराचा सारा भर निव्वळ राजकीय पैलूंभोवतीच घोंघावत राहिला. *(कृपया पृष्ठ क्रमांक २९ पाहावे)*

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

संशोधन

# उपेक्षेच्या तळाशी दडपलेले कर्तृत्व

'स्त्रीचे हृदय हे सागराच्या तळासारखे सखोल आणि अथांग असते...' त्रिखंडात गाजलेल्या 'टायटॅनिक' या चित्रपटातील नायिकेच्या मुखीचे हे वाक्य...चित्रपटाच्या अंतिम पर्वात उच्चारलेले. अतिशय आशयघन असे हे विधान. स्त्रीचे अंतरंग आणि सागरतळाचे अथांगत्व या दोहोंतील साम्य अधोरेखित करणारे. दोहोंचाही तळ धुंडाळण्याचा प्रयत्न केला तर तळाशी पडून राहिल्यामुळे तिथवर अज्ञात राहिलेली अनंतानंत गुपिते विश्वासमोर उलगडली जाऊन मानवी जीवनव्यवहाराची अंतर्बाह्य घुसळणच जणू घडून येईल...या संभाविताचे सूचन घडणारे ते वाक्य चित्रपटगृहातून बाहेर पडणा-या प्रेक्षकांच्या मनाचा ठाव काही सोडत नाही. काय योगायोग आहे पहा... सागराचा तळ धुंडाळण्याचे शिवधनुष्य उचलण्यास एका महिलेनेच पुढे सरसवावे याला योगायोग नाही तर दुसरे काय म्हणायचे त्या अ-साधारण महिलेचे नाव - मारी थार्प (Marie Tharp)

प्रचंड जिज्ञासा आणि उदंड अभ्यास यांच्या बळावर सागरतळाचा विशुद्ध वैज्ञानिक नकाशा तयार करणारी मारी थार्प ही जगातील पहिलीवहिली महिला. तिने केलेल्या त्या खटाटोपापायीच, अमेरिका आणि आफ्रिका या दोन खंडांना एकमेकांपासून विलग करणा-या Mid-Atlantic Ridgeचे वास्तव १९५२ साली जगापुढे उलगडले गेले. केवळ इतकेच नाही तर, मारी थार्प यांच्या त्या संशोधनाद्वारेच plate-tectonicsच्या सिध्दांताला पुष्टी मिळाली. एवढेच नाही तर, मारी थार्प यांच्या त्या सा-या अभ्यासामुळे पृथ्वीच्या उत्पत्तीशी संबंधित अनेकानेक बाबींचा उलगडा झाला आणि त्या दिशेने करावयाच्या पुढील अभ्यास व संशोधनासाठी एक नवीनच दिशा भूगर्भशास्त्रज्ञांना सापडली.

हा शोध लागला तेव्हाचा तो काळ आजच्या तुलनेत खरोखरच आगळावेगळा असा होता. तेव्हा ना होते संगणक ना होते इंटरनेट. सागरसफरीवर जाणे हेदेखील समस्त स्त्रीजातीच्या लेखी तेव्हा एक



दिव्यच गणले जायचे. परंतु, आपल्या अचूक नकाशाचित्रांवरुन आणि तीव्र बुध्दीमत्तेच्या जोरावर, तिथवर खास पुरुषांचा बालेकिल्ला समजल्या जाणा-या विषयात मारी थार्प यांनी आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकविला. एवढे सगळे साध्य करूनही तत्कालीन पुरुषप्रधान संस्कृतीचा फटका त्यांना बसलाच. मारी थार्प यांचे ते देदिप्यमान यश जगापुढे येण्यासाठी २१वे शतक उजाडावे लागले ते त्यांपायीच.

मारी थार्प या होत्या भूगर्भशास्त्रज्ञ. ३० जुलै १९२० हा त्यांचा जन्मदिवस. मातीचे सर्वेक्षण करून नकाशे तयार करण्याच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या पित्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला तो अमेरिकेतील मिशिगन येथे. लहानपणापासूनच मारी अतिशय हुशार होत्या. विज्ञान या विषयाचे त्यांना प्रचंड आकर्षण. वडिलांच्या कामामध्ये मदत करण्याची त्यांना अत्यंत आवड आणि असोशी. परंतु तो काळच असा होता की, विज्ञान अथवा विज्ञानाच्या शाखोपशाखांचे अध्ययन करण्यास स्त्रियांना जणू एक प्रकारची अघोषित बंदीच होती. केवळ त्याच व तेवढ्याचा कारणापायी ॲनापोलिस येथील सेंट जॉन्स महाविद्यालयात त्यांना प्रवेश नाकारण्यात आला. कारण काय तर, ते महाविद्यालय होते विज्ञानशाखेच्या शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी ! मग उपायच खुंटला. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर, त्यांमुळे, मारी यांनी ओहायो येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला. वडिलांची सततची फिरतीची नोकरी असल्यामुळे मारी यांनी एकंदर २० वेगवेगळ्या शाळांमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. ओहायो विद्यापीठातून १९४३ साली इंग्रजी आणि संगीत या विषयांत मारी यांनी पदवी संपादन केली. आयुष्यात कोणती संधी कधी आणि कोणत्या रूपात चालून येईल हे सांगता येत नसते. तसेच काहीसे मारी यांच्याबाबतीत झाले. त्याचे असे झाले की, जवळपास सगळेच तरूण दुस-या महायुद्धाच्या आघाडीवर गेल्याने मिशिगन विद्यापीठात भूगर्भशास्त्राच्या एका अभ्यासक्रमात मुलींसाठी जागा रिकाम्या झाल्या. या संधीचा लाभ उठवायचाच हे मारी यांनी ठरविले आणि त्यांनी विद्यापीठाकडे प्रवेशासाठी अर्ज केला. तो मंजूर झाला आणि मारी त्या अभ्यासक्रमात दाखल झाल्या. भूगर्भशास्त्राशी त्यांची पहिलीवहिली ओळख झाली ती तिथे आणि अशी. गंमत म्हणजे, तो

अभ्यासक्रम पूर्ण करणा-या त्या पहिल्यावहिल्या विद्यार्थिनी ठरल्या आणि 'Petroleum Geology Girl' हा किताबही त्यांना बहाल करण्यात आला.

हा अभ्यासक्रम १९४४ साली पूर्ण झाल्यावर मारी थार्प या नोकरीसाठी स्टॅन्डर्ड ऑइल ॲन्ड गॅस कंपनीमध्ये रूजू झाल्या. ही कंपनी ओक्लाहोमा येथे होती. कंपनीमध्ये कामास प्रत्यक्ष सुरु वात केल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, प्रत्यक्ष क्षेत्रीय कामावर (field work) महिलांना पाठवलेच जात नाही. स्त्रियांनी काम करायचे ते कार्यालयात बसूनच, असाच त्या कंपनीचा खाक्या. क्षेत्रीय पाहणीवर रवाना झालेल्या पुरु ष सहकार्यांकडून मिळालेल्या माहितीचे संकलन करणे आणि नकाशे काढणे यांसारखी कामे स्त्रियांकडे सोपवली जात. या कंपनीत चाकरीस असतानाच मारी यांनी गणित या विषयात १९४८ साली आणखी एक पदवी प्राप्त केली. ही पदवी पदरात पाडून घेतल्यानंतर मग मारी यांनी ती नोकरी सोडली आणि संशोधन साहाय्यक म्हणून Lamount Geological Laboratory येथे त्या काम करूलागल्या. तेथील एक संशोधक Maurice Ewing यांच्या साहाय्यक संशोधक म्हणून त्यांची उमेदवारी सुरू झाली. ही प्रयोगशाळा होती कोलंबिया विद्यापीठात.

याच प्रयोगशाळेत काम करत असताना त्यांची ओळख Bruce Hazeen या भूगर्भशास्त्रज्ञाशी झाली. Hazeen यांच्याबरोबर काम करताना सुरु वातीला दोघांनी मिळून दुस-या महायुद्धाच्या वेळेस कुठे कुठे विमाने पाडली गेली याबद्दलची माहिती गोळा केली आणि त्यानुसार नकाशे बनविले. त्या नंतर ते दोघे मिळून सागराच्या खोल तळाशी असलेल्या भागांचे नकाशे बनवण्याच्या कामात गुंतले. कामाच्या निमित्ताने Hazeen यांना सागरसफरीवर जाण्याची संधी अनेकदा मिळत असे, पण मारी यांना मात्र कार्यालयातच थांबावे लागत असे. त्या मागचे कारणही मोठे मजेदारच होते. स्त्रिया जहाजावर गेल्या तर काही तरी अपशकून घडेल, अशी धारणा त्या काळी सर्वत्रच फार बळकट होती. त्यांमुळे, Hazeen यांनी पाठवलेल्या माहितीच्या आधारे नकाशे बनव, तपशीलाचे संकलन कर, आकडेवारीवरून मूल्यमापनाचे आराखडे व तंत्र तयार कर, अशा प्रकारची कामे मारी कार्यालयात बसूनच उरकत असत. यथावकाश, दोघांनी



मिळून मग उत्तर प्रशांत महासागर, दक्षिण प्रशांत महासागर, अरबी समुद्र यांचे नकाशे बनविले.

त्या दोघांचे हे सगळे काम असे सुरू असतानाच, नकाशावर सहजपणे न दिसणा-या पण आपले अस्तित्व दर्शविणा-या अनेक गोष्टींचा मारी विलक्षण लक्षपूर्वक आणि अतिशय बारकाईने अभ्यास करीत असत. आपल्याला वाटतो त्या प्रमाणे समुद्राचा तळ सरळसोट नसतो; तर, अनेक खाच-खळगे, अनंत प्रकारचे उंचवटे, खोल द-या, डोंगर आणि टेकड्यासदृश भूभाग, भेगा अशा प्रकारच्या चित्रविचित्र रचना व आकारांनी तो नटलेला आहे, असे मारी यांना दिसून आले. वास्तवाच्या त्या आकलनावर अगदी सुरु वातीला मारी यांचाही लगोलग विश्वास बसला नाही. खात्रीपूर्वक खुंट हलवून बळकट करण्यासाठी म्हणून त्यांनी मग अनेकदा तेच तेच तपशील, त्याच त्याच गोष्टी परत परत तपासल्या आणि त्यांवरू न पुन्हा पुन्हा नकाशे, रेखाचित्रे तयार केली. अशा सगळ्या पुनर्तपासणीअंती मात्र जे आपल्याला दिसले-जाणवलेले आहे ते सारे वास्तवच आहे याबद्दल मारी यांची खात्री पटली.

त्यांनी मग तो सगळा तपशील Hazeen यांना विदित केला. परंतु, त्यांनी मात्र मारी यांच्या त्या सा-या कथनाची 'बाईलबुद्धीचे बोल' म्हणून उपेक्षा-संभावना केली. परंतु, त्याचे फारसे वाईट वाटून न घेता मारी मात्र ती Hazeen यांच्याबरोबर काम करीतच राहिल्या. काही काळानंतर मारी आणि Hazeen यांनी समुद्राच्या पोटातील डोंगरांची जणू एक श्रृंखलाच शोधून काढली. त्या शोधाद्वारे त्या उभयतांनी मिळून पृथ्वीचा जणू कणाच शोधला. Mid-Oceanic Ridges या शीर्षकाने त्या दोघांचे ते शोधन पुढे प्रस्थापित झाले. या पर्वतरांगांपायीच पृथ्वीच्या पाठीवर आज दिसणारे खंड निर्माण झाले, ते परस्परांपासून वेगळे झाले वा होत गेले, हे जगाला त्या शोधाद्वारे समजले. ज्या पृथ्वीवर आपण राहतो ती पृथ्वीही खंडांमध्ये विभागली गेलेली आहे, या सत्याचा उलगडा सगळ्या विश्वाला त्या दोघांच्या या संशोधनामुळेच झाला. मारी या जे काही सांगत होत्या त्यांबाबत Hazeen यांचीही यथावकाश खातरजमा झाली. परंतु, एवढे होऊ नही, Hazeen यांनी पुढे त्यावर आधारित जो एक लेख प्रसिद्ध केला त्यांत मारी

थार्प यांना त्या संदर्भातील संशोधनाबाबतचे कोणतेही श्रेय मात्र त्यांनी दिले नाही !

या दोघांच्या कामामुळे आणि मुख्य म्हणजे मारी यांनी तयार केलेल्या अचूक नकाशांवरून तोवर अज्ञातच राहिलेल्या अनेकानेक बाबी प्रथमच प्रकाशात आल्या. भूगर्भशास्त्राच्या प्रांतातील पुढील संशोधनाच्या दृष्टीने अभ्यासकांसाठी त्या ज्ञानक्षेत्रातील अनंत दालने त्यांमुळे खुली झाली. हे शोध लागत असतानाच मारीचे आणि Dr. Ewing यांचे काही कारणांवरून भांडण झाले. खरे तर त्याचे कारण होते निराळेच. त्याचे असे झाले की, एकदा Hazeen हे मारी यांना आपल्याबरोबर घेऊन जहाजावर गेले. Dr. Ewing यांना ते अजिबात आवडले नाही. मारी यांनी मग पुढे ती प्रयोगशाळा सोडली आणि आपला स्वतंत्र उद्योग सुरु केला. तत्पूर्वी Hazeen आणि मारी या दोघांनी एकत्रितरीत्या एक पुस्तक आणि संशोधनपर अनेक लेख प्रसिध्द केले. १९७७ साली Hazeen यांचे देहावसान झाले. मारी थार्प यांनी मात्र आपले कार्य चालूच ठेवले. त्यांनी मोठ्या परिश्रमपूर्वक हाती घेऊन तडीस नेलेला समुद्रतळाचा नकाशा Hazeen यांच्या पश्चात प्रसिद्ध करण्यात आला. अमेरिकेच्या नौदलात तोच नकाशा आजतागायत वापरण्यात येतो. Library of Congressच्या भूगोल आणि नकाशे विभागाच्या शतकपूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, Women Pioneer in Oceangraphy हा पुरस्कारही त्यांना १९९९ साली देण्यात आला. Woods Hole Oceanographic Institution या संस्थेच्यावतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा Lamont-Doherty Heritage हा पुरस्कार देऊन मारी यांना २००१ साली गौरविण्यात आले. या क्षेत्रात काम करणा-या मुलींसाठी मारी यांच्या नावाने एक अभ्यासवृत्ती २००४ सालापासून देण्यात येते आहे. कर्करोगामुळे मारी थार्प यांचे २००६ साली देहावसान झाले.

मारी यांच्या असाधारण कर्तृत्वाची यथार्थ ओळख जगाला अगदी अलीकडेच झाली ती, मारी यांनी तयार केलेला नकाशा लोकांना वापरण्यासाठी 'गूगल'ने २००९ साली उपलब्ध करुन दिला तेव्हा ! ●●



सामाजिक

# सरकारचा आकार फुगला आहे का ?

सरकारचा आकार नेमका असावा तरी किती, या एका अत्यंत विवाद्य मुद्यासंदर्भात सर्वत्र सदोदित चर्चा झडत असते. सरकारी खर्चाचे त्या त्या देशाच्या एकंदर ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण आणि/अथवा सरकारी कर्मचा-यांचे त्या त्या देशाच्या एकंदर लोकसंख्येशी असलेले प्रमाण ही दोन गमके त्यासाठी वापरली जातात. या संदर्भात विकसित देश आणि विकसनशील देश या दोन गटांत ठळक फरक दिसतो. सर्व स्तरांवरील सरकारी कर्मचा-यांचे त्या त्या देशाच्या लोकसंख्येशी असणारे प्रमाण तपासले की तो फरक डोळ्यांत भरतो. विकसित देशांच्याबाबतीत हे प्रमाण विकसनशील देशांच्या तुलनेत खूपच मोठे दिसते. विकसनशील देशांच्या गटातही या संदर्भात भरपूर वैविध्य दिसते (या संदर्भातील एक लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या गेल्या म्हणजे फेब्रुवारी २०१७च्या अंकात सादर करण्यात आलेला होता). या सगळ्या चित्रात भारत कोठे आणि कसा दिसतो, हा कोणालाही औत्सुक्याचा वाटावा असाच प्रश्न.

हा प्रश्न आपल्याही देशात प्रसंगोपात्त चर्चिला जातोच. नवीन वेतन आयोग नेमला जाण्याबाबत सरकारने घोषणा केली अथवा/आणि वेतन आयोगाचा अहवाल सरकारला सादर झाला रे झाला की या प्रश्नासंदर्भातील चर्चेचे मोहोळ उठते. परंतु, तिथे दोन गोष्टी प्रामुख्याने होतात. एक तर, चर्चेचे ते गु-हाळ लगोलग थंडावते. दुसरे म्हणजे, सारी चर्चा एकवटते ती वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली जाण्याने सरकारी तिजोरीवर पडणा-या संभाव्य बोज्याभोवती. सरकारी कर्मचा-यांचे वेतन व भत्ते हा सरकारच्या महसुली खर्चाचा एक महत्त्वाचा घटक. सरकारी कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीची आणि त्यांमुळे वेतनरचनेची पुनर्मांडणी केली गेली की आपसूकच वेतन व निवृत्तिवेतन या दोहोंपायी वेच होणा-या रकमेत वाढ होते. साहजिकच, सरकारचा महसुली खर्च वाढतो. ... आणि सारे गणित हुकते ते नेमके तिथेच.

सरकारी कर्मचा-यांच्या वेतन व निवृत्तिवेतनावरील खर्च वाढला की तिजोरीत जमा होणा-या महसुलाचा वाढीव भाग हे दोन खर्च भागवण्याकडे वापरला वा वळला जातो. मग, महसुली खर्चाच्या खात्यावरील अन्य बाबींसाठी तरतूद अपुरी ठरू लागते. त्या अन्य बाबींसाठी आवश्यक ती तरतूद करायची तर महसुली खात्यावर तूट निर्माण होते. एक तर, राजकोषीय उत्तरदायित्व कायद्याच्या (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी ॲन्ड बजेट मॅनेजमेन्ट ॲक्ट) बंधनानुसार सरकारला महसुली खात्यावर तूट असताच कामा नये. दुसरे म्हणजे, महसुली तूट उद्‌भवली की तिची परिणती वित्तीय तुटीचे भगदाड रुंदावण्याबरोबरच वित्तीय तुटीच्या गुणवत्तेचा -हास घडून येण्यात होते. महसुली तूट भरून काढण्यासाठी सरकारला जी कर्जउभारणी करावी लागते ती कर्जे बहुशः अनुत्पादक असतात. महसुली तुटीची तोंडमिळवणी करण्यासाठी केल्या जाणा-या कर्जउभारणीपायी व्याजाचा भरणा बोकांडी बसतो. दुसरे म्हणजे, वित्तीय तूट भरून काढण्यासाठी सरकारला कराव्या लागणा-या कर्जउभारणीपैकी काही हिस्सा महसुली खर्च भागवण्याकडे वळवावा लागतो. यांतून एक म्हणजे, सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनाचा तोल पार ढासळतो आणि दुसरे म्हणजे सरकारच्या कर्जाची जडणघडणही दूषित बनते.

या सगळ्यांपायी, ''सरकारचे आकारमान उगाचच भरपूर वाढलेले आहे, सरकारच्या पदरी अनावश्यक कर्मचा-यांची खोगीर भरती मोठ्या प्रमाणावर झालेली आहे, नोकरशाही म्हणजे सुस्त असा पांढरा हत्ती बनलेला आहे... अशा प्रकारच्या धारणा जनसामान्यांच्या मनात मूळ धरू लागतात. परिणामी, ''सरकारी नोकरबंदीवर पाबंदी जारी करावी, सरकारी कर्मचा-यांच्या संख्येत कपात करायला हवी...'' अशा प्रकारची मतमतांतरे घुमायला लागतात. वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली जाण्याने सरकारी तिजोरीवर वाढणा-या बोज्यापायी सरकारनेही अलीकडील काळात नोकरभरतीला अंकुश लावलेला आहे. या सगळ्या गदारोळात, सरकारच्या पदरी असणा-या मनुष्यबळाचा व त्यांत आवश्यक असणा-या फेरबदलांचा, सुधारणांचा पैलू पार अडगळीतच ढकलला जातो. चर्चेचे फड गाजतात ते हा संवेदनशील मुद्दा सोडून अन्य विषयांबाबतच.



**सतत धोशा कर्मचारी कपातीचाच...**

वेतन आयोगाच्या शिफारशींचा विचारही मुख्यतः वित्तीय पैलूंच्या अंगानेच केला जाण्याने सरकारी नोकरांच्या संख्येत कपात घडवून आणण्याच्या मुद्याचाच उहापोह हिरिरीने करण्यात येतो. सरकारच्या पदरी असलेल्या एकंदर मनुष्यबळाची जडणघडण कशी आहे, शासनसंस्थेची अर्थकारणातील भूमिका भविष्यात कशा प्रकारे बदलत जाणार आहे, 'आर्थिक उदारीकरण' या संकल्पनेमध्ये अध्याहृत असल्याप्रमाणे 'बाजारपेठ' आणि 'शासनसंस्था' या दोन भागीदारांच्या विकासप्रक्रियेतील जबाबदा-या कशा प्रकारे बदलत जाण्याच्या शक्यता दिसतात, ते बदल सामावून घेण्याच्या दृष्टीने सरकारी कर्मचा-यांचे संख्यात्मक तसेच गुणात्मक मूल्यमापन केले जाणे गरजेचे नाही का, शासनसंस्थेच्या विविध स्तरांवर जबाबदा-यांचे जे वाटप झालेले आहे त्या वाटपाच्या चौकटीत त्या त्या स्तरावरील शासकीय मनुष्यबळ कसे दिसते, त्या त्या स्तरावरील कर्मचा-यांच्या संरचनेत काही बदल आवश्यक आहेत किंवा नाही, कार्यालयीन कामांमध्ये प्रशासकीय स्तरावर धोरणात्मक बाबींसंदर्भातील निर्णय घेणारे उच्चपदस्थ सरकारी बाबू आणि अनंत प्रकारच्या सार्वजनिक सेवासुविधांच्या पुरवठ्यात थेट गुंतलेले शासनाच्या निम्न व मध्यम स्तरांतील क्षेत्रीय कर्मचारी यांचे परस्परप्रमाण कसे आहे, ते प्रमाण बदलण्याची निकड भासते का... अशांसारख्या संवेदनशील बाबींसंदर्भात अर्थपूर्ण व गंभीर चर्चेचा आपल्या व्यवहारात घाऊक अभावच राहिलेला आहे. शासकीय सेवा, पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा आणि एकंदरीनेच प्रशासकीय गुणवत्ता व 'गव्हर्नन्स'च्या दर्जावर प्रत्यक्ष प्रभाव पाडणा-या या सगळ्या पैलूंबाबत जबाबदार चर्चा न होताच, केवळ कर्मचा-यांच्या संख्येत कपात घडवून आणण्याचाच धोशा लावण्याचे परिणाम आज दिसू लागलेले आहेत. कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर एक तर ते पद भरावयाचेच नाही अथवा प्रदीर्घ काळ ते रिकामेच ठेवायचे असा खाक्या अवलंबल्याचे दुष्परिणाम दुहेरी होत राहतात. एक म्हणजे, संबंधित कामाची आबाळ होते आणि दुसरे म्हणजे, सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांवर अतिरिक्त ताण येतो. ही बाब आपण ध्यानात घेणार की नाही ?

आपल्या देशातील सरकारी कर्मचा-यांच्या संख्येत अलीकडील काही वर्षांत घडून आलेल्या बदलांची चिकित्सा आपल्याला या सगळ्या पार्श्वभूमीवर करायला हवी. त्यासाठी आपल्या हाताशी माहितीचे दोन स्त्रोत उपलब्ध होतात. केंद्र सरकारच्या सेवेतील कर्मचा-यांची शिरगणती करून ती आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येते. हा झाला त्या दोहोंतील पहिला स्त्रोत. दुसरे म्हणजे केंद्र सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत असलेल्या रोजगार व प्रशिक्षण महासंचालनालयातर्फे प्रकाशित झालेल्या आकडेवारीचा आपण या ठिकाणी आधार घेणार आहोत. दरवर्षीच्या ३१ मार्च रोजी शासनाच्या विविध स्तरांवर सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांची संख्या हे महासंचालनालय संकलित करत असते. दरवर्षीच्या अर्थसंकल्पाच्या आधल्या दिवशी सरकारच्यावतीने जो आर्थिक सर्वेक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर सादर करण्यात येतो त्यात ही आकडेवारी देण्यात येते. केंद्र सरकार, राज्य सरकारे, नाना प्रकारची निमसरकारी आस्थापने आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशा शासनयंत्रणेच्या निरनिराळ्या स्तरांवर सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांची संख्या तिथे पृथक-पृथक दिलेली सापडते.

आपण सुरुवात करू ती शासकीय कर्मचा-यांच्या एकूण संख्येपासून. या विश्लेषणासाठी आपण आधार घेणार आहोत तो आर्थिक पाहणी अहवालात सादर करण्यात आलेल्या सांख्यिकीचा. १९९१ सालापासून ते २०११ सालापर्यंत शासनसंस्थेच्या या प्रत्येक स्तरावरील कर्मचारी संख्येमध्ये कसकसे बदल होत आलेले आहेत, याचा तपशील न्याहाळणे अतिशय उद्बोधक ठरते. केंद्र सरकार, राज्य सरकारे, निमसरकारी आस्थापने व स्थानिक स्वराज्य संस्था अशी शासनसंस्थेच्या विविध स्तरांवर सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांची एकंदर संख्या १९९१ या वर्षात होती १ कोटी ९० लाख ५८ हजार इतकी. तर, २००१ आणि २०११ या दोन वर्षी तीच संख्या दिसते अनुक्रमे १ कोटी ९१ लाख ३८ हजार आणि १ कोटी ७५ लाख ५० हजार अशी. म्हणजे, १९९१ आणि २०११ या दोन टोकांचाच काय तो विचार केला तर, या दोन दशकांदरम्यान विविध स्तरांवरील शासनयंत्रणेत कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या संख्येत जवळपास आठ टक्क्यांनी घट झाल्याचे चित्र आपल्या पुढ्यात उभरते.



**संख्येतील बदलांचा कल मननीय**

परंतु, एकंदर शासकीय कर्मचा-यांच्या संख्येतील बदलाचा हाच कल जरा अधिक तपशीलवार न्याहाळला तर हेच चित्र वेगळे दिसते. १९९१ साली १ कोटी ९० लाख ५८ हजारांच्या घरात असलेली शासकीय कर्मचा-यांची ही संख्या १९९५ साली पोहोचलेली दिसते १ कोटी ९४ लाख ६६ हजारांवर. ही वाढ भरते अवघी दोन टक्के इतकी. १९९७ साली हीच संख्या वाढलेली दिसते १ कोटी ९५ लाख ५९ हजार अशी. १९९५ सालातील संख्येत ही भर आहे अर्ध्या टक्क्याहूनही कमी. १९९७ सालानंतर मात्र सर्व स्तरांतील शासनसंस्थेच्या पदरी असणा-या कर्मचारी संख्येमध्ये सतत उतरती भाजणीच दृष्टीस पडते.

सरकारी कर्मचारी आणि त्या त्या देशाची एकंदर लोकसंख्या यांची काही एक तुलना शक्य व्हावी या साठी दर एक लाख लोकसंख्येमागे किती सरकारी कर्मचारी देशोदेशी आहेत हे बघितले जाते. २०१२ सालाच्या आगेमागे, अमेरिकेमध्ये दर एक लाख अमेरिकी नागरिकांमागे सर्व स्तरांतील शासकीय कर्मचारी होते तब्बल ७ हजार ६८१ इतके. आता, आपल्या देशात हे चित्र कसे दिसते ते बघू. दर एक लाख भारतीय नागरिकांमागे सर्व स्तरांतील शासकीय कर्मचा-यांची संख्या १९९१ साली होती २ हजार ३३५ इतकी. पुढील दोन दशकांत ती घसरणीला लागली. २००१ आणि २०११ या दोन वर्षांत तीच संख्या दिसते अनुक्रमे १ हजार ८६३ आणि १ हजार ४५० अशी. १९९१ ते २०११ या २० वर्षांत दर एक लाख लोकसंख्येमागील सरकारी कर्मचा-यांच्या संख्येत घडून आलेली ही घसरण जवळपास ३८ टक्के इतकी भरते.

सरकारी कर्मचारी आणि लोकसंख्या यांचे प्रमाणही बघण्यासारखेच आहे. १९९१ साली हे प्रमाण होते केवळ २.३३ टक्के इतके. तर, २००१ आणि २०११ या दोन वर्षी हेच प्रमाण अनुक्रमे १.८६ टक्के आणि १.४५ टक्के असे दिसले. भारतासारखा खंडप्राय, अनंत प्रकारच्या विविधता आणि विषमतांनी व्यापलेला देश चालवण्यासाठी एकूण लोकसंख्येच्या जेमतेम दीड टक्का इतके असणारे सरकारी कर्मचारी अतिरिक्त आहेत, असे समजणे कितपत उचित ठरेल ?

हे झाले शासनाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरील सरकारी कर्मचा-यांच्या एकंदर संख्येतील बदलांचे निरीक्षण. स्तरनिहाय कल निरखले तर तेही तितकेच मननीय दिसतात. आपण सुरु वात करू ती केंद्र सरकारच्या सेवेतील कर्मचा-यांपासून. १९९१ साली केंद्र सरकारच्या सेवेत असणा-या कर्मचा-यांची एकंदर संख्या होती ३४ लाख ११ हजार इतकी. २००१ आणि २०११ या दोन वर्षी हीच संख्या दिसते अनुक्रमे ३२ लाख ६१ हजार आणि २४ लाख ६० हजार अशी. म्हणजे, १९९१ आणि २०११ याच दोन कालबिंदूंचा विचार केला तर, दरम्यानच्या दोन दशकांत केंद्र सरकारच्या कर्मचारी संख्येत जवळपास २८ टक्क्यांनी घट घडून आल्याचे चित्र आपल्या नजरेसमोर उभरते. १९९१ साली देशभरात जे १ कोटी ९० लाख ५८ हजार इतके एकूण सरकारी कर्मचारी होते त्यांत केंद्र सरकारच्या सेवेत असणा-या कर्मचा-यांचे प्रमाण भरत होते १७.९० टक्के इतके. हेच प्रमाण २०११ साली उतरलेले दिसते १४ टक्क्यांवर. केंद्र सरकारच्या सेवेत असणा-या कर्मचा-यांची संख्या दर एक लाख लोकसंख्येमागे १९९१ साली होती ४१८ इतकी. त्या नंतरच्या केवळ दोनच दशकांत ही संख्या निम्म्याने घटून उतरलेली दिसते २०३ वर. तर, २०१२ साली अमेरिकेमध्ये तीच संख्या होती ८४० इतकी !

सरकारी कर्मचा-यांच्या चार पदरी वर्गवारीतील तीन वर्गांतील कर्मचा-यांच्या संख्येत १९९१ ते २०११ या काळात घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरू न आपल्या ध्यानात येते. या दोन दशकांत वाढ दर्शवणारा सरकारी कर्मचा-यांचा एकच वर्ग दिसतो आणि तो म्हणजे राज्य सरकारांच्या सेवेतील कर्मचा-यांचा. १९९१ साली देशभरातील राज्य सरकारांच्या सेवेत एकंदर ७१ लाख १२ हजार इतके कर्मचारी होते. त्या नंतरच्या दोन दशकांदरम्यान या संख्येत अवघी दीड टक्क्याने वाढ होऊ न २०११ साली तीच संख्या पोहोचलेली दिसते ७२ लाख २० हजारांवर. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांनी नोकरभरतीबाबत किती कठोर धोरण राबविले असावे, याची साक्ष ही आकडेवारी पुरवते. संघटित क्षेत्रातील रोजगार वाढीचा वेग ढेपाळण्यात या धोरणाचा वाटा मोठाच असला पाहिजे.



जी बाब केंद्र सरकार आणि राज्य सरकारांची तीच बाब निमसरकारी आस्थापनांची. देशातील निमसरकारी आस्थापनांत काम करणा-या कर्मचा-यांच्या संख्येत, १९९१ आणि २०११ या दोन कालबिंदूंदरम्यान, ६.६२ टक्क्यांनी घट घडून आल्याचे आकडेवारीवरू न आपल्या ध्यानात येते. १९९१ साली ६२ लाख २२ हजारांच्या घरात असणारी त्यांची संख्या २०११ साली ५८ लाख १० हजारांपर्यंत खाली आलेली दिसते.

कर्मचा-यांच्या संख्येमध्ये १९९१ आणि २०११ या २० वर्षांच्या कालावधीदरम्यान घट घडून येण्याच्या टक्केवारीसंदर्भात, केंद्र सरकारच्या खालोखाल दुस-या क्रमांकावर येतात त्या संपूर्ण देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्था. ठिकठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १९९१ साली काम करणा-या कर्मचा-यांची संख्या होती २३ लाख १३ हजार इतकी. या संख्येमध्ये, १९९१ ते २०११ या कालावधीदरम्यान ११.३७ टक्क्यांची घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते. देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असणा-या सरकारी कर्मचा-यांची संख्या २०११ साली उतरली होती २० लाख ५० हजारांवर. शहरी भारतातील पायाभूत सेवासुविधांची गुणवत्ता सातत्याने खालावताना दिसण्यामागील एक मुख्य कारण हे असावे, असे मानण्यास जागा आहे. संघराज्य पद्धतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसारख्या शासनसंस्थेच्या तिस-या आणि सत्तेच्या उतरंडीत सगळ्यांत तळाला असणा-या या स्तराकडे सोपविण्यात आलेली कामे व जबाबदा-या श्रमिकप्रधान आहेत. सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, मलनिःस्सारण, पाणीपुरवठा, शहरांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, प्राथमिक शिक्षण, दिवाबत्ती... यांसारख्या, शहरवासियांच्या सर्वसाधारण कल्याणाची पातळी टिकवून धरण्याच्या दृष्टीने अत्यंत कळीच्या समजल्या जाणा-या सेवासुविधा स्वरू पतःच श्रमिकबहुल आहेत. शासनसंस्थेच्या नेमक्या याच स्तरावरील मनुष्यबळामध्ये अलीकडील काळात सातत्याने कपात जारी होते आहे. शहरांना जर आपण 'विकासाची इंजिने' असे संबोधणार असू, तर हा कल कितपत स्वीकारार्ह म्हणायचा ?

सरकारचा आकार अतिरिक्त फुगलेला आहे असे आपण तरीही म्हणणार आहोत का ? ●●

पुरवणी

# भारतातील शहरनियोजन

## शहरीकरणाचा ‘पॅटर्न’ आणि आव्हाने

वाढत्या मात्रेने हातपाय पसरणा-या शहरीकरणाचे चांगल्यापैकी सुविहित व्यवस्थापन करणे आणि शहरांच्या लोकसंख्येनुसार मांडल्या जाणा-या उतरंडीतील निरनिराळ्या स्तरांत वसलेल्या व आपापल्या स्वायत्त अशा रंगाढंगाने विस्तारणा-या लहानमोठ्या शहरांना शहरनियोजनाची योग्य अशी मात्रा वेळच्यावेळी चाटवणे हे देशोदेशींच्या नगरनियोजनकारांच्या पुढ्यातील आजमितीचे अतिशय जटिल असे आव्हान होय. विशेषतः, विकसनशील देशांमधील नागरीकरणाची काही अंगभूत वैशिष्ट्ये पाहता हे आव्हान अधिकच बिकट व गुंतागुंतीचे असल्याचे शाबीत होते आहे.

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक आणि आपल्या देशातील एक अग्रगण्य अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, दोन दिवस चालणा-या एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन संस्थेच्यावतीने दरवर्षी करण्यात येते. आपल्या देशासमोरील एखाद्या प्रचलीत आर्थिक, सामाजिक वा राजकीय चर्चाविषयाचा सांगोपांग उहापोह घडावा हा या उपक्रमामागील हेतू. यंदाचे चर्चासत्र संस्थेच्या पुण्यातील वास्तूमध्ये तारीख १६ व १७ डिसेंबर २०१६ अशा दोन दिवशी पार पडले.* ***“भारतातील शहरनियोजन : उद्‌भवणारे प्रश्न आणि आव्हाने”*** *असा या चर्चासत्राचा बीजविषय होता. दोन दिवस चाललेल्या त्या विचारविमर्शाच्या संपादित अंशाचा हा दुसरा भाग ‘अर्थबोधपत्रिके’च्या वाचकांसाठी आवर्जून सादर करत आहोत.*

***● संपादक***



जगाच्या विकसनशील पट्ट्यातील देशांमध्ये आजवर घडून आलेल्या नागरीकरणाच्या विस्तारावर एक नजर जरी टाकली तरी त्या वाढविकासाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये (की वैगुण्ये ?) ताबडतोब डोळ्यांत भरतात. नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक सरासरी वेग आणि नागरी लोकसंख्यावाढीचा वार्षिक सरासरी वेग या दोहोंतील तफावत, हे झाले पहिले वैशिष्ट्य. संयुक्त राष्ट्रांनी १९८३ साली तयार केलेल्या एका अहवालाने नोंदविल्यानुसार, १९७०-७५, १९७५-८० आणि १९८०-८५ या तीन कालखंडांदरम्यान विकसनशील देशांमधील नागरीकरणाचा वार्षिक सरासरी वेग अनुक्रमे १.४३ टक्के, १.५८ टक्के आणि १.५६ टक्के असा राहिला. तर, नेमक्या त्याच तीन कालखंडांदरम्यान विकसनशील देशांमधील नागरी लोकसंख्या दरसाल सरासरी अनुक्रमे ३.९ टक्के, ३.७ टक्के आणि ३.६ टक्के दराने वाढत राहिली होती. त्याच अहवालात नमूद केल्यानुसार, २०१०-२५ या कालावधीदरम्यान विकसनशील देशांमधील नागरीकरणाच्या वाढीचा वार्षिक सरासरी दर साधारणपणे १.३२ टक्के असा राहील. तर, त्याचदरम्यान विकसनशील देशांमधील नागरी लोकसंख्यावाढीचा वार्षिक सरासरी दर २.५ टक्के इतका असेल.

शहरनियोजनाच्या संदर्भात विकसनशील देशांमध्ये घडून येत असलेल्या नागरी वाढविस्ताराचा हा पैलू विलक्षण महत्त्वाचा ठरतो. एखाद्या देशाच्या एकंदर लोकसंख्येपैकी जेवढी लोकसंख्या त्या देशातील नागरी विभागांमध्ये वास करत असते त्यांवरून त्या त्या देशाची नागरीकरणाची सरासरी पातळी निश्चित होते. नागरीकरणाच्या या सरासरी पातळीमध्ये वाढ घडून येण्याचा वार्षिक सरासरी वेग म्हणजे ‘नागरीकरणाचा वेग’. तर, देशोदेशींच्या नागरी विभागांत सामावलेल्या नागरी लोकसंख्येमध्ये दरसाल ज्या सरासरी वेगाने वाढ घडून येते त्यास ‘नागरी लोकसंख्यावाढीचा वेग’ असे म्हणतात. एखाद्या देशातील नागरीकरणाच्या वाढविस्ताराचा सरासरी वार्षिक वेग त्या देशातील नागरी लोकसंख्यावाढीच्या वार्षिक सरासरी वेगापेक्षा अधिक असेल तर त्यांतून एक गोष्ट सूचीत होते. त्या देशातील नागरीकरणाचा विस्तार त्या देशातील काहीच नागरी विभागांमध्ये एकवटतो आहे, हे वास्तव या दोन दरांतील ती तफावत अधोरेखित करते.

**महानगरीय केंद्रीकरणाची सबळ प्रवृत्ती**

विकसनशील देशांमधील नागरी विस्ताराचे दुसरे वैशिष्टय या पहिल्या वैशिष्ट्याशी अभिन्नपणे जोडलेले आहे. विकसनशील देशांमधील नागरी लोकसंख्येमध्ये घडून येणारी वाढ ही, मुख्यतः, पूर्वापार अस्तित्त्वात असणा-या शहरांची लोकसंख्या फुगण्यातूनच घडून येते आहे. निरनिराळ्या आकारमानाची अनेक शहरे काळाच्या ओघात नव्याने निर्माण होत आहेत आणि त्यांच्याच जोडीने पूर्वीपासून विद्यमान असणारी शहरेही लोकसंख्येच्या दृष्टीने वाढत आहेत व या दोहोंच्या एकत्रित प्रभावातून नागरीकरणाचा विस्तार घडून येतो आहे, असे चित्र विकसनशील देशांमध्ये प्रकर्षाने दिसत नाही. पूर्वीपासून अस्तित्त्वात असलेली शहरेच लोकसंख्या स्वतःकडे खेचत राहतात. पण हे इथेच आणि एवढ्यावरच थांबत नाही. एखाद्या देशातील शहरांची लोकसंख्येच्या आकारमानानुसार जी काही उतरंड तिथे नांदत असते त्या उतरंडीच्या विविध स्तरांतील लहानमोठी शहरे सर्वसाधारणपणे समांतर परंतु आपापल्या मगदुराप्रमाणे वाढत असतात, असेही घडताना दिसत नाही. शहरांच्या उतरंडीमध्ये सर्वांत वरच्या थराला असणारी, आकारमानाने प्रचंड अशी महानगरेच आपल्याकडे लोकसंख्या, उद्योगव्यवसाय, कारखानदारी, देशी-विदेशी गुंतवणूक, रोजगाराच्या संधी, स्थलांतरित खेचून घेत असतात, असाच सार्वत्रिक अनुभव आहे. लोकसंख्येचे केंद्रीकरण महानगरांमध्ये घडत राहण्याची ही प्रवृत्ती दिवसेंदिवस प्रबळच होत चालल्याचा अनुभव आहे. परिणामी, मोठ्या शहरांचे, महानगरांचे व्यवस्थापन व नियोजन एक तर पूर्णपणे कोलमडलेले दिसते अथवा ते हाताबाहेर जाऊ न निरर्थक तरी बनलेले असते.

आपल्या देशातील नागरीकरणाचा आजवर उत्क्रांत होत आलेला 'पॅटर्न' जगभरातील विकसनशील देशांमध्ये साकारलेल्या आकृतिबंधाशी पूर्णपणे मिळताजुळता आहे. केवळ इतकेच नाही तर, अन्य विकसनशील देशांच्या तुलनेत भारतातील असमान नागरी वाढविस्ताराला आणखी एक परिमाण आहे - आणि ते म्हणजे राज्याराज्यांदरम्यानच्या विषम शहरीकरणाचे. शहरनियोजनाच्या प्रक्रियेतील अडथळ्यांची शर्यत जाणून घ्यायची तर आपल्या देशातील असमान शहरीकरणावर एक दृष्टिक्षेप टाकायला हवा.



आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही आपल्या देशातील सहा मोठी राज्ये नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सतत आघाडीवर राहिलेली आहेत. या सहाही राज्यांमधील नागरीकरणाची सरासरी पातळी नागरीकरणाच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा कायम अधिक राहिलेली आहे. नागरीकरणाची प्रक्रियाही याच सहा राज्यांमध्ये पूर्वापार एकवटत आलेली आहे. देशाच्या एकंदर लोकसंख्येमध्ये या सहा राज्यांच्या एकत्रित लोकसंख्येचे प्रमाण १९८१ साली होते ४२.५२ टक्के इतके. परंतु, देशभरातील एकूण शहरी लोकसंख्येपैकी ५४.६७ टक्के शहरी लोकसंख्या याच सहा राज्यांमध्ये सामावलेली होती. शहरीकरणाच्या केंद्रीकरणाचा हा कल अगदी २००१ सालापर्यंत अबाधित राहिल्याचे संबंधित आकडेवारी बघता आपल्या ध्यानात येते. २००१ सालातील जनगणनेच्या आकडेवारीनुसार, या सहा राज्यांच्या एकत्रित लोकसंख्येचे देशाच्या एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण होते ४०.७१ टक्के इतके. मात्र, देशभरातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी ५१.८९ टक्के शहरी लोकसंख्या २००१ साली याच सहा राज्यांमध्ये एकवटलेली होती.

शहरीकरणाच्या वाढविस्तारात देशभरात आघाडीवर असलेल्या या सहा राज्यांतील नागरी लोकसंख्येचे त्या त्या राज्यातील शहरांच्या सहापदरी उतरंडीदरम्यान विभाजन कसे आहे, ते बघणे आता या टप्प्यावर मनोज्ञ ठरते. शहरांच्या लोकसंख्येनुसार केलेले त्यांचे असे सहापदरी वर्गीकरण आपल्याला जनगणनेच्या अहवालांतच मिळते. आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या सहा राज्यांतील शहरी लोकसंख्येपैकी किती टक्के लोकसंख्या त्या त्या राज्यांतील शहरांच्या उतरंडीमध्ये शिरोभागी असणा-या मोठ्या शहरांमध्ये १९८१ साली एकवटलेली होती हे बघायला गेले तर ती टक्केवारी अनुक्रमे ५३.६९, ५७.९२, ५८.६०, ७५.२४, ६२.१९ आणि ७६.८४ अशी दिसते. याच सहा राज्यांसाठी हीच टक्केवारी २००१ साली अनुक्रमे ७५.३१, ७६.५०, ६७.२०, ७९.७०, ५६.३५ आणि ८३.५४ अशी असल्याचे आढळून येते. एक लाख अथवा त्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारे नागरी विभाग या सहापदरी वर्गीकरणात शिरोभागी असतात. शहरनियोजनकारांपुढील जटिल आव्हान आहे ते हेच.

**मुख्य समस्या व आव्हान असमान वाढविस्ताराचे**

आपल्या देशातील आर्थिक-औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या, तुलनेने प्रगत राज्यांमध्येच ही प्रवृत्ती दिसून येते, असेही नाही. बिहार, मध्य प्रदेश, ओडिशा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या शेतीप्रधान राज्यांमधील शहरी वाढविस्ताराचा 'पॅटर्न'ही असाच दिसतो. या पाच राज्यांतील शहरी लोकसंख्येपैकी अनुक्रमे ५४.१२ टक्के, ४६.८४ टक्के, ४१.६३ टक्के, ४६.५२ टक्के आणि ५१.४९ टक्के लोकसंख्या त्या त्या राज्यातील मोठ्या शहरांमध्ये (म्हणजे, एक लाख अथवा त्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असणा-या नागरी विभागांमध्ये) एकवटलेली होती. हाच कल २००१ सालापर्यंतही कायम राहिल्याचे आपल्या ध्यानात येते. २००१ सालच्या जनगणनेची आकडेवारी अभ्यासली तर, या पाचही शेतीप्रधान राज्यांमधील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी अनुक्रमे ५९.३१ टक्के, ५५.७७ टक्के, ४८.४१ टक्के, ५७.२३ टक्के आणि ६२.१६ टक्के इतकी शहरी लोकसंख्या ही, त्या त्या राज्यातील, एक लाख अथवा त्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असणा-या नागरी विभागांत केंद्रीभूत झालेली होती. शहरीकरणाच्या प्रक्रियेत ही राज्ये देशभरात त्या मानाने पिछाडीवर राहत आलेली आहेत. या पाचही राज्यांमधील नागरीकरणाची सरासरी पातळी ही कायमच नागरीकरणाच्या राष्ट्रीय पातळीपेक्षा कमी राहिलेली दिसते. तरीही, आकारमानाने मोठ्या असणा-या नागरी विभागांत एकवटण्याची नागरी वाढविस्ताराची प्रवृत्ती तिथेही, इतरत्र दिसते तशीच, सबळ दिसते ही बाब नजरेआड करता येत नाही. आकारमानाने मोठ्या असणा-या नागरी विभागांचे नियोजन करणे हे उत्तरोत्तर गुंतागुंतीचे व अवघड का बनत जाते आहे, याची कल्पना या सगळ्या चित्रावरून आता यावी.

नागरी विभागांचे, आपल्या देशात, दोन प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. या दोन गटांना अनुक्रमे 'स्टॅट्युटरी टाउन्स' आणि 'सेन्सस् टाउन्स' असे संबोधले जाते. या दोन गटांतील नागरी विभागांच्या संख्येत भर पडण्याचा आकृतिबंधही पुन्हा निरनिराळा आहे. तो 'पॅटर्न' निराळा आहे एवढेच केवळ नाही तर तो ब-यापैकी अस्थिरही आहे. शहरनियोजनकारांना या पैलूचाही उचित असा परामर्श घेणे भाग पडते.



ज्या सगळ्या नागरी विभागांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, छावणी मंडळ (कॅन्टॉन्मेन्ट बोर्ड) अथवा नगरपंचायत यांसारखी एखादी स्थानिक स्वराज्य संस्था संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार स्थापन झालेली असेल, अशा सर्व नागरी विभागांना 'स्टॅट्युटरी टाउन्स' असे म्हटले जाते. तर, अशी कोणतीच स्थानिक स्वराज्य संस्था नाही परंतु जी ठिकाणे शहरी रंगरूपाची ठसठशीत जाणीव करून देतात त्यांचा समावेश 'सेन्सस् टाउन्स' या दुस-या वर्गात केला जातो. अशा ठिकाणांची निवड त्या त्या राज्यातील जनगणना यंत्रणेमार्फत केली जाते. अर्थातच, अशा निवडीसाठी काही निश्चित असे निकष तयार करण्यात आलेले आहेत. वापरण्यात येणारे हे निकष एकूण तीन असून ते पुढीलप्रमाणे - (१) किमान लोकसंख्या ५००० असणे (२) लोकसंख्येची घनता (म्हणजे, एक चौरस किलोमीटर इतक्या क्षेत्रावर वास करणा-या व्यक्तींची संख्या) ४०० इतकी असणे आणि (३) बिगर शेती उद्योगधंद्यांद्वारे रोजीरोटी कमावणा-या पुरूष मुख्य श्रमिकांचे एकंदर मुख्य श्रमिकांमध्ये असणारे प्रमाण ७५ टक्के अथवा त्यांपेक्षा अधिक असणे. एखाद्या ठिकाणाला 'सेन्सस टाउन' म्हणून निर्देशित केले जाण्यासाठी जनगणना यंत्रणेकरवी उपयोजिले जाणारे हे तीन निकष लोकसंख्याविषयक तसेच आर्थिक स्वरूपाचे आहेत. हे तीनही निकष एकाच वेळी पूर्ण करणा-या गावांना अथवा ठिकाणांना 'सेन्सस टाउन्स' असे संबोधून त्यांचा समावेश नागरी विभागांमध्ये करण्यात येतो.

या दोन्ही गटांतील नागरी विभाग मिळून आपल्या देशात १९८१ सालच्या जनगणनेनुसार एकंदर ४ हजार २९ इतके नागरी विभाग होते. १९९१, २००१ आणि २०११ या पुढील तीन दशकांदरम्यान नागरी विभागांच्या या संख्येत अर्थातच वाढ होत राहिली. १९९१, २००१ आणि २०११ या तीन वर्षांसाठीच्या जनगणना अहवालांनुसार आपल्या देशातील नागरी विभागांची एकंदर संख्या अनुक्रमे ४ हजार ६८९, ५ हजार १६१ आणि ७ हजार ९३५ अशी होती. देशातील एकूण नागरी लोकसंख्या १९८१ साली १५ कोटी ९४ लाख ६२ हजार ५४७ इतकी होती. पुढील तीन दशकांत या संख्येमध्ये भर पडून २०११ सालच्या जनगणनेनुसार ती ३७ कोटी ७१ लाख ६ हजार १२५वर जाऊन पोहोचली.

**दोन गट आणि वाढीच्याही दोन त-हा**

'स्टॅट्युटरी टाउन्स' आणि 'सेन्सस् टाउन्स' या दोन गटांतील नागरी विभागांमध्ये घडून येणा-या संख्यात्मक वाढीचा आकृतिबंधही पुन्हा निरनिराळा आहे, या वास्तवाचे नेमके भान ठेवणे हे आपल्या देशातील नगरनियोजनकारांना अगत्याचे ठरते. त्या आकृतिबंधाचा परिचय करून घेण्याआधी आणखी एका 'ट्रेन्ड'ची ओळख करून घ्यायला हवी. १९८१ साली आपल्या देशात एकंदर ४ हजार २९ इतके नागरी विभाग होते. २०११ सालातील जनगणनेनुसार नागरी विभागांची ती संख्या त्या वर्षी वाढलेली होती ७ हजार ९३५ पर्यंत. म्हणजेच, १९८१ ते २०११ या तीन दशकांदरम्यान आपल्या देशातील नागरी विभागांच्या संख्येमध्ये जवळपास ९७ टक्क्यांनी वाढ झालेली होती. १९८१ साली १५ कोटी ९४ लाख ६२ हजार ५४७ इतकी असलेली आपल्या देशातील शहरी लोकसंख्याही त्या नंतरच्या ३० वर्षांत वाढून २०११ साली ३७ कोटी ७१ लाख ६ हजार १२५ वर पोहोचलेली होती. म्हणजे, १९८१ ते २०११ या कालावधीदरम्यान आपल्या देशातील शहरी लोकसंख्येमध्ये १३६.४९ टक्क्यांनी वाढ घडून आलेली होती. याच काळात देशातील नागरी केंद्रांच्या संख्येमध्ये घडून आलेली वाढ ९७ टक्के इतकी म्हणजे, देशातील शहरी लोकसंख्येमध्ये घडून आलेल्या १३६.४९ टक्के इतक्या वाढीपेक्षा कमी होती. याचाच अर्थ हा की, १९८१ ते २०११ या तीन दशकांच्या कालावधीत आपल्या देशातील नागरीकरणाचा घडून आलेला वाढविस्तार हा बहुशः पूर्वापार अस्तित्त्वात असलेल्या शहरांच्या लोकसंख्येमध्ये भर पडण्यातूनच घडून आलेला दिसतो.

याचा अर्थ, १९८१ आणि २०११ या दोन कालबिंदूंदरम्यान आपल्या देशातील नागरी केंद्रांच्या संख्येत काही ना काही भर पडलीच. परंतु, खरी गंमत दिसते ती नेमकी इथेच. 'स्टॅट्युटरी टाउन्स'च्या संख्येत पडणारी भर आणि 'सेन्सस टाउन्स'च्या संख्येत पडणारी भर यांचा 'पॅटर्न' परस्परांपेक्षा बराच वेगळा आहे, ही बाब नगरनियोजनाच्या संदर्भात या पुढील काळात अतिशय कळीची ठरणार आहे. ही सगळी प्रक्रिया आपण किती तपशीलवार नीट समजावून घेतो त्यांवरच खूप काही अवलंबून असेल हे निश्चित.



देशातील एकंदर नागरी केंद्रांमध्ये असणारे 'स्टॅट्युटरी टाउन्स' आणि 'सेन्सस् टाउन्स' यांचे असणारे प्रमाण अलीकडील काळात झपाट्याने बदलते आहे. १९८१ साली देशभरात जी ४ हजार २९ इतकी नागरी केंद्रे होती त्यांत 'स्टॅट्युटरी टाउन्स'ची संख्या होती २ हजार ७५८ इतकी. तर, 'सेन्सस् टाउन्स'ची संख्या होती १ हजार २७१ इतकी. म्हणजे, एकूण नागरी केंद्रांमध्ये या दोन वर्गांतील नागरी केंद्रांचे प्रमाण भरते अनुक्रमे ६८.४५ टक्के आणि ३१.५५ टक्के असे. २०११ साली आपल्या देशात असणा-या एकूण ७ हजार ९३५ नागरी केंद्रांमध्ये 'स्टॅट्युटरी टाउन्स'ची संख्या होती ४ हजार ४१ इतकी तर; 'सेन्सस् टाउन्स'ची संख्या होती ३ हजार ८९४ इतकी. या दोन गटांतील नागरी विभागांचे एकूणांतील हे प्रमाण भरते अनुक्रमे ५०.९३ टक्के आणि ४९.०७ टक्के असे. १९८१ आणि २०११ या दोन कालबिंदूंची तुलना केली तर दरम्यानच्या तीन दशकांत 'स्टॅट्युटरी टाउन्स'च्या संख्येत भर पडली १२८३ इतक्यांची तर, 'सेन्सस् टाउन्स'च्या संख्येत भर पडली २६८३ इतक्यांची. टक्केवारीच्या परिभाषेत बोलायचे तर, १९८१ ते २०११ या काळात 'स्टॅट्युटरी टाउन्स'च्या संख्येत वाढ घडून आली ४६.५२ टक्क्यांनी तर, त्याच काळात 'सेन्सस् टाउन्स'च्या संख्येत भर पडली तब्बल २०६.३७ टक्क्यांनी.

'स्टॅट्युटरी टाउन्स' आणि 'सेन्सस् टाउन्स' या दोन गटांतील नागरी केंद्रांच्या संख्येमध्ये घडून आलेल्या वाढीचा काळाशी असलेला संदर्भही नीट समजावून घ्यायला हवा. 'सेन्सस् टाउन्स'च्या संख्येत लक्षणीय भर पडलेली दिसते ती २००१ ते २०११ या दशकभरात. तर, 'स्टॅट्युटरी टाउन्स'च्या संख्येमध्ये घसघशीत भर पडलेली दिसते ती १९९१ ते २००१ या दशकभरात. 'सेन्सस् टाउन्स'च्या निश्चितीकरणात जनगणना यंत्रणेचे घटक सार्वत्रिक काटेकोरपणा जपत नाहीत, असा एक मोठा आक्षेप अभ्यासकांकडून नेहमीच घेतला जातो. ते एकवेळ खरे मानले तरी, २००१ ते २०११ या एकाच दशकात 'सेन्सस् टाउन्स'च्या संख्येत एवढी भर का पडली असेल हा प्रश्न उरतोच. हे आणि असे सगळेच प्रश्न नगरनियोजनकारांच्या पुढ्यात उभे ठाकतच राहणार आहेत. ●●

पुरवणी

# शहरनियोजनाचा उगम, गरज आणि गाभा

नागरीकरणाच्या वाढत्या झपाट्याबरोबर येत्या काळात आपल्या देशातील अधिकाधिक नागरिक नगरा-महानगरांमध्येच आपले बस्तान ठोकतील हे तर उघडच दिसते आहे. ग्रामीण परिसरांच्या तुलनेत शहरी जीवन हे अधिकच गुंतागुंतीचे, वेगवान आणि वैविध्यपूर्ण असते. त्यांमुळे, वाढत्या शहरीकरणाचा तोल सांभाळत असतानाच शहरी जीवनाच्या गुणवत्तेची इयत्ता सुधारायची तर काटेकोर शहरनियोजनास पर्याय नाही. 'शहरनियोजन' ही मुळातच बहुआयामी संकल्पना होय. शहरांतर्गत भू-वापर, शहरी जीवनाशी निगडित सामाजिक तसेच आर्थिक बाबींचे नियोजन, पायाभूत सेवासुविधांची पुरेशी तरतूद, शहरी पर्यावरणीय संगोपनाच्या पैलूचे संवेदनशील भान... अशा अनेक बाबींना शहरनियोजनाची संकल्पना पोटाशी घेत असते. शहरी जीवनाची कार्यक्षमता, शहरी जीवनव्यवहारांचे सातत्य, शहरवासियांच्या कल्याणाची सर्वसाधारण पातळी टिकवून धरणे हा खरे म्हणजे 'शहरनियोजन' या संकल्पनेचा गाभा. शहरनियोजनाचा सगळा खटाटोप हाच मूळ हेतू केंद्रवर्ती कल्पून केला जातो. केला गेला पाहिजे.

व्यक्तीप्रमाणेच कोणतेही शहर हे एक जिवंत, रसरशीत अस्तित्त्व असते. शहर म्हणजे एक विलक्षण गतिमान चीज होय. सतत रूप पालटणारे, वाढणारे, बदलणारे असे ते एक जैविक अस्तित्त्व गणले जाते, गणावे लागते. त्यांमुळे, कधी तरी षटीसामासी एकदाच काय ते शहरनियोजन हाती घेऊन भागतच नाही. शहराचे बदलते भौगोलिक रूपडे, शहरांतर्गत लोकसंख्येमध्ये घडून येणारे बदल, तंत्रशास्त्रीय सुधारणा व नवशोधन, शहरी जीवनातील सामाजिक तसेच आर्थिक स्थित्यंतरे, पायाभूत व कळीच्या सेवासुविधांची, साधनसामग्रीची उपलब्धता, वाढती स्पर्धा... अशांसारख्या अनंत परिवर्तनांना नेमका, पर्याप्त आणि चपखल प्रतिसाद लवचीकपणे देणे हे शहरनियोजनाचे सार गणले जाते.



भारतीय राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली ७४ वी दुरु स्ती शहरनियोजनाच्या संदर्भात विशेष महत्त्वाची ठरते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदा-यांचे तसेच कामांचे निर्देशन त्या घटनादुरुस्तीद्वारे अतिशय सुस्पष्टपणे करण्यात आलेले आहे. राज्यघटनेत त्या दृष्टीने १२ वी सूची मुद्दाम अंतर्भूत करण्यात आली. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात याव्यात अशा कामांची याद त्या सूचीत नमूद केलेली आहे. कामे व जबाबदा-यांच्या त्या यादीत 'शहरनियोजन' ही शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आद्य जबाबदारी म्हणून अगदी पहिल्या क्रमांकावर अग्रस्थानी निर्देशित करण्यात आलेली दिसते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निभावयाच्या कामांच्या त्या सूचीत दुस-या व तिस-या क्रमांकांवर नमूद केलेल्या जबाबदा-याही 'शहरनियोजन' या आद्य जबाबदारीशी जैविक नाते असलेल्याच आहेत. शहरांतर्गत भू-वापराचे तसेच बांधकामांचे नियमन करणे आणि शहराच्या आर्थिक-सामाजिक विकासासाठी नियोजन करणे, ही त्या यादीतील अनुक्रमे दुस-या व तिस-या क्रमांकांवरील कामे. या दोन्ही विषयांची नाळ, जबाबदा-यांच्या त्या यादीत शिरोभागी अग्रस्थानी असलेल्या 'शहरनियोजन' या आद्य कामाशी जुळलेली अशीच आहे. आपापल्या अखत्यारीतील शहराचे नियोजन करणे आणि शहरनियोजनाचे उत्तरदायित्व निभावून नेणारे शासनकेंद्र म्हणून शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी भूमिका बजावणे हे ७४ व्या घटनादुरु स्तीला मुदलातच अपेक्षित आहे.

मुळात, शहरनियोजनाच्या संकल्पना आपण - म्हणजे भारताने - बव्हंशी उचलल्या त्या पश्चिमेकडूनच. अर्थात, पश्चिमी देशांतही शहरनियोजनाची संकल्पना काही अवचितच आकाशातून टपकली नाही. शहरनियोजनाच्या संकल्पनेचा जन्म झाला तो औद्योगिक क्रांतीच्या कुशीतून. औद्योगिक क्रांतीनंतरच्या आजवरच्या वाटचालीदरम्यान अनुभवाच्या झोळीत जमा झालेल्या संचिताची पुंजी 'शहरनियोजन' या संकल्पनेच्या उत्क्रांतीस कायम टेकू पुरवत आलेली आहे. शहरनियोजनाच्या विचारविश्वाचा उगम होण्यापूर्वी पाश्चिमात्य राष्ट्रांमधील शहरेही अस्ताव्यस्त, गबाळी, अस्वच्छ आणि नियोजनशून्य अशीच होती.

**टप्प्याटप्प्याने विस्तार आणि उत्क्रांती**

निरामय असे शहरी जीवन सामुदायिकरीत्या व्यतीत करण्याच्या दृष्टीने सुभग, आधुनिक शहर म्हणून १९व्या शतकाच्या पूर्वार्धातील, म्हणजे १८५० सालापूर्वीचे, पॅरिस गणले जाणे शक्यच नव्हते. सन १८५२ ते १८७० या काळात हॉसमन यांच्या कल्पक आणि द्रष्ट्या नेतृत्त्वाखाली पॅरिसचा अंतर्बाह्य कायापालट घडून आला. पॅरिसने जणू कातच टाकली. आजचे रूपसुंदर पॅरिस म्हणजे त्याच अवस्थांतराची परिणती. हॉसमन यांनी शहरनियोजनाबाबत पुरविलेल्या दृष्टीमुळेच अनारोग्य आणि साथीच्या रोगांचे तत्कालीन पॅरिसमधून उच्चाटण शक्य बनले. शहरांतर्गत वाहतुकीमध्ये सुसूत्रता आली. शहरी बांधकामांची कार्यकुशलता आणि कार्यक्षमतेची मात्रा चांगल्यापैकी उंचावली. पॅरिसला भव्यता लाभली.

औद्योगिक क्रांतीनंतरच्या कालखंडात, १८व्या शतकाच्या मध्यावर ब्रिटनमधील शहरांनाही नाना प्रकारच्या समस्यांचा सामना निरंतर करावा लागला. लंडन, मॅन्चेस्टर, ग्लासगो यांसारख्या आघाडीच्या औद्योगिक शहरांत झोपडपट्ट्यांनी ऐसपैस हातपाय पसरलेले होते. त्या अग्रगण्य शहरांत नव्यानेच उभ्या राहिलेल्या उद्योगधंद्यांमधून रोजीरोटी मिळवण्याच्या आशेने रोजगाराच्या शोधात येणाऱ्या ग्रामीण स्थलांतरितांच्या लाटा सतत आदळत राहात. या स्थलांतरितांना निवासासाठी गाळे वा घरे कोठून मिळावीत ? साहजिकच, जागा मिळेल तिथे त्या स्थलांतरितांनी त्यांचे तात्पुरते निवारे उभारले. त्यांतूनच झोपटवस्त्यांचा फैलाव झाला. सार्वजनिक स्वच्छतेचा आणि आरोग्याचा प्रश्न त्या सगळ्यांतूनच यथावकाश निपजला.

या दुरवस्थेमध्ये पालट घडून येण्यास सुरुवात झाली ती १८७५ साली ब्रिटनमध्ये अस्तित्त्वात आलेल्या सार्वजनिक आरोग्य कायद्यामुळे. शहरातील नागरिकांच्या व्यवहारांद्वारे, नगरवासियांच्या उपक्रमशीलतेमुळे शहरांच्या वाढविस्तारास इंधनपुरवठा सुरू होतो. त्यांतूनच शहरे हातपाय पसरू लागतात. त्यांमुळे, शहरांच्या वाढीस काहीएक शिस्त लावण्याच्या दृष्टीने, शहरविस्तारास हातभार लावणाऱ्या नागरी व्यवहारांमध्ये गरज पडेल तेव्हा, आवश्यकता वाटेल तिथे व निकडीचा असेल तेवढा हस्तक्षेप करण्याची मुभा त्या कायद्याने शासनयंत्रणेस बहाल केली.



शहरांच्या वाढीस काहीएक शिस्त लावण्यासाठी हस्तक्षेप करण्याची कायदेशीर मुभा सरकारला मिळाल्याचे अपेक्षित परिणाम मग तिथे दिसू लागले. शहरांत लोकसंख्येचे होणारे केंद्रीकरण, त्यांपायी वाढणारी गर्दी व गजबज यांना पायबंद घातला गेला. शहरांत, शहरांमधील वस्त्यांत, वस्त्यांतील घरांत पुरेसा हवाप्रकाश खेळण्यास त्यांमुळे अवकाश प्राप्त झाला. परंतु, तरीही त्या काळात शहरे अस्वच्छ आणि कुरूपच होती. त्यांमुळे सगळा प्राथमिक भर होता तो शहरी आरोग्याचे रक्षण करण्यावरच. आरोग्यसंवर्धनाच्या उपक्रमांना सौंदर्यप्रवर्तक उपायांची जोड यथावकाश लाभली परंतु ती खूप नंतर. शहरनियोजनाच्या संकल्पनेने मग हळूहळू तिचे, आपल्याला आज दिसणारे, बहुआयामी स्वरूप धारण केले. समन्यायी दृष्टी आणि सातत्यशीलता यांचे समन्वयकारक संतुलित प्रवर्तन घडवणाऱ्या नियोजनविषयक एकात्म भूमिकेची उत्क्रांती पुढील कालखंडात क्रमाने घडून आली.

शहरनियोजनाची पूर्वअट असणारी न्यायिक तसेच संस्थात्मक चौकट आपल्या देशात २०व्या शतकाच्या उत्तरार्धात साकारली ती याच सगळ्या पार्श्वभूमीवर. 'शहरनियोजन'नामक संकल्पना आपल्या देशात बाळपावलांनी अवतरली ती ब्रिटिश अंमलादरम्यान आणि 'सुधारणा न्यासां'चे (इम्प्रुव्हमेन्ट ट्रस्ट्स्) अंगडेटोपडे लेवून. आपल्या अगदी निकटच्या परिसरातील सार्वजनिक जीवनाचा दर्जा अंमळ उंचावण्याच्या ऊर्मीतून त्या न्यासांचा जन्म झालेला होता. पुढे, तत्कालीन मुंबई इलाख्याने या संदर्भात आघाडी घेत, १९१५ साली, 'बॉम्बे टाउन प्लॅनिंग ॲक्ट' अंमलात आणला. अर्थात, त्यामागेदेखील प्रेरणा होती ती १९०९ साली अस्तित्त्वात आलेल्या 'ब्रिटिश हाउसिंग ॲन्ड टाउन प्लॅनिंग ॲक्ट'ची.

शहराच्या विविध भागांसाठी शहरनियोजनाच्या योजना तयार करण्याबाबतची तरतूद 'बॉम्बे टाउन प्लॅनिंग ॲक्ट'द्वारे करण्यात आली. 'सुधारणा न्यासां'च्या 'मॉडेल'च्या तुलनेत प्रगतीची ती मोठीच झेप ठरली. ब्रिटिश अमदानीत अस्तित्त्वात आलेल्या या शहरनियोजन कायद्याची जागा, पुढे १९४७ साली अस्तित्त्वात आणल्या गेलेल्या 'टाउन ॲन्ड कन्ट्री प्लॅनिंग ॲक्ट'ने घेतली. ●●

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

शहरी समस्या आणि त्यांबाबतची धोरणविषयक भूमिका त्या गोंधळात गडपच राहिली. नागरीकरणाच्या वाढविस्तारात देशपातळीवर अग्रस्थानी असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणुका हिरिरीने लढवणा-या एकाही राजकीय पक्षाकडे शहरविकासाची काही एक ठोस दृष्टी असल्याचा मागमूसही कोठे लागला नाही, ही आश्चर्यजनक बाब म्हणायची, अस्वस्थकारक गोष्ट म्हणायची की खेदकारक वस्तुस्थिती म्हणायची ? अनंत प्रकारच्या अडचणी व विषमता यांनी महाराष्ट्रातील शहरी वाढविस्तार (बि)घडलेला आहे. केवळ ग्रामीण महाराष्ट्रातूनच नव्हे तर लहान शहरांकडून महानगरांकडे सरकण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रातील स्थलांतरामध्ये अतिशय स्पष्टपणे दिसते. एकीकडे राज्यातील कुंठित शेती आणि एकंदरच ग्रामीण अर्थव्यवस्था तर, दुसरीकडे बकालीकरणापायी रंजीस आलेली शहरे, असे हे विकासाचे दुहेरी जटिल आव्हान आहे. शहर नियोजनाच्या संदर्भात उद्याचे मुख्य आव्हान ठरणार आहे ते नेमके हेच. याच पैलूसंदर्भातील काही कळीच्या मुद्यांचा उहापोह या अंकात मांडलेला आहे. ●●

**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines** -: Journal of Indian School of Political Economy, Volume XXV, Number 1-4, January-March 2013, April-June 2013, July-September 2013, October-December 2013, pp. 41-66.

**(B) पुस्तके** : (1) Economic Survey 2009-10; Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division, February 2010, Oxford University Press, New Delhi, 2010, Price - Rs. 325/- (2) Economic Survey 2015-16, Volume II, Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division, February 2016, Oxford University Press, New Delhi, 2016, Price - Rs. 845/-

**(C) Websites**- : (1)www.thehindu.com/news/national/30 January 2012. ●●



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणा-या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणा-या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०१६ (प्रकाशकाची सही)



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ● 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ● भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ● अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ● इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ● संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

● संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

● अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका ● रमानाथ झा
● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया ● ललित देशपांडे ● दिलीप नाचणे
● सुहास पळशीकर ● मनोहर भिडे ● नीळकंठ रथ ● रूपा रेगे-नित्सुरे
● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**